ePaper

║ वर्ष - 8 ।अंक -97 ║UDYAM-MH-26-0158827║

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ║मंगळवार, दिनांक 15 ऑक्टोंबर 2024║ पुणे आवृत्ती ║ mahaenews.com ║ maha_enews ║ Mahaenews

## प्रवाशांची दिवाळी होणार गोड! दिवाळीतील हंगामी भाडेवाढ रद्द, एसटी महामंडळाचा निर्णय



### आतील पानांत


- खेळाडूबद्दल मत मांडणे चुकीचे
- ऑस्ट्रेलियाकडून खूप शिकू शकतो
- मी वाहणारी नदी : प्रियांका
- भारताने कॅनडाला पुन्हा फटकारलं


## विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुकांची मोर्चेबांधणी

# भोसरीतील ‘मशाल’ निष्ठावंतांचीच!

### शिवसेना नेत्या सुलभा उबाळे ठरणार ‘डार्क हॉर्स’? : गव्हाणे, लांडगे यांना ‘थर्ड फ्रंट’चा पर्याय

। पिंपरी ।महाईन्यूज

**महाविकास आघाडीमध्ये जागा वाटप आणि मुख्यमंत्रीपदाचा चेहरा कोण? याबाबत खलबत सुरू असतानाच पिंपरी-चिंचवडमधील तीनपैकी एक मतदार संघात ‘मशाल’ पेटवण्याचे निश्चित झाले आहे. त्यासाठी भोसरीची जागा निश्चित केली असून, या मतदार संघातील इच्छुक उमेदवारांमध्ये मोठी रस्सीखेच आहे. त्यामुळे गावकी-भावकीच्या वादात न पडता निष्ठावंत शिवसैनिकाला उमेदवारी द्यावी, अशी मागणी पक्षश्रेष्ठींकडे करण्यात आली असून, या आधारे शिवसेना नेत्या सुलभा उबाळे यांना ‘डार्क हॉर्स’ मानले जात आहे.**




पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसेना ठाकरे गटाची स्वतंत्र ताकद आहे. पिंपरीतून माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार आणि शहर प्रमुख सचिन भोसले उमेदवारीसाठी तीव्र दावेदार आहेत. चिंचवडमध्येसुद्धा शिवसेना ठाकरे गटाच्या ‘मशाल’ चिन्हावर लढण्यास इच्छुक तयार आहेत. त्यामध्ये माजी नगरसेवक राहुल कलाटे, नाना काटे यांचा उल्लेख केला जातो. भोसरी मतदार संघात माजी नगरसेवक रवि लांडगे आणि शिवसेना नेत्या सुलभा उबाळे या दोघांनी शिवसेना ठाकरे गटाकडून तयारी केली आहे. तसेच, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून माजी नगरसेवक अजित गव्हाणे इच्छुक आहेत. “महाविकास आघाडीचे तिकीट कुणालाही मिळाले, तरी आम्ही एकोप्याने काम करणार” असा दावा इच्छुकांकडून केला जात आहे. पक्षश्रेष्ठी उमेदवार देतील. त्याचा प्रचार करावा लागणार असल्यामुळे सर्वच इच्छुकांनी आपआपल्या परीने ताकद लावली आहे. विशेष म्हणजे, भोसरी विधानसभा निवडणुकीचा निकाल फिरवण्याची ताकद असलेले माजी आमदार विलास लांडे यांनी मात्र आपली भूमिका अद्याप गुलदस्त्यात ठेवली आहे.

तिघांच्या वादात चौथ्याचा लाभ या सूत्रानुसार ऐनवेळी लांडे मैदानात उतरतील काय? असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे. तसेच गावकी-भावकीच्या वादात न पडता शिवसेना निष्ठावंत उमेदवाराला संधी देईल, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.



### ... तर अजित गव्हाणे, रवि लांडगे यांना ‘थर्ड फ्रंट’चा पर्याय

राष्ट्रवादीचे नेते अजित गव्हाणे आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते रवि लांडगे यांनी निवडणुकीची जोरदार तयारी केली आहे. मात्र, निवडणुकीच्या तोंडावर त्यांनी पक्षात प्रवेश केल्यामुळे पक्षश्रेष्ठींकडे त्यांचा ‘ॲक्सिस’ तुलनेत कमी आहे. सर्वच इच्छुक उमेदवारांना पक्षश्रेष्ठींनी कामाला लागा, असे संकेत दिल्यामुळे उमेदवारीची माळ कुणाच्या गळ्यात पडणार? याबाबत अनिश्चितता आहे. परिणामी, गेल्या दोन-तीन महिन्यांपासून तयारी केलेली असताना ‘अभी नहीं तो कभी नहीं’ या भूमिकेत गव्हाणे आणि लांडगे आहेत. त्यामुळे उमेदवारी सुलभा उबाळे यांच्या नावावर महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून शिक्कामोर्तब झाल्यास लांडगे, गव्हाणे यांना राज्यात निर्माण होणाऱ्या ‘थर्ड फ्रंट’चा पर्याय राहणार आहे. त्यामुळे भोसरीची निवडणूक तिहेरी होईल, असा दावा राजकीय जाणकारांकडून केला जात आहे.

## ‘राष्ट्रवादी’चा निर्णय आज; पुण्यातील उमेदवारांबाबत बैठक

### यादी मंजुरीसाठी शरद पवारांकडे, उच्चपदस्थ सूत्रांची माहिती

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या पुण्यातील १३ ते १४ विधानसभेच्या जागांवरील उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी आज, मंगळवारी पुण्यात बैठक होणार आहे. या बैठकीत उमेदवारांच्या नावावर चर्चा केल्यानंतर ती यादी अंतिम मंजुरीसाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्याकडे पाठविण्यात येणार असल्याचे उच्चपदस्थ सूत्रांनी सांगितले.**



सन २०१९च्या विधानसभा निवडणुकीत पुण्यातील २१ जागांपैकी १० जागांवर पक्षाचे आमदार उमेदवार निवडून आले होते. याव्यतिरिक्त खडकवासला, दौंड या दोन जागांवर ‘राष्ट्रवादी’ला अत्यंत कमी मतांनी पराभवाला सामोरे जावे लागले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने या निवडणुकीत १५ जागांवर निवडणूक लढवली होती. यंदाच्या निवडणुकीत १५ पैकी १४ जागांवर उमेदवार देण्याचा ‘राष्ट्रवादी’ चा प्रयत्न आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या सूचनेनुसार खासदार सुप्रिया सुळे, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अशोक पवार यांच्या उपस्थितीत स्थानिक नेत्यांची मंगळवारी बैठक होणार असून, त्यामध्ये १४ जागांवरील उमेदवारांची नावे निश्चित करून शरद पवारांकडे अंतिम निर्णयासाठी पाठविण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.’राष्ट्रवादी’मध्ये धुसफूस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये जुन्नर, भोसरी, हडपसर, मावळ आणि इंदापूर येथील जागांवरून धुसफूस सुरू आहे. भोसरीची जागा ‘राष्ट्रवादी’ने स्वतःकडे घेतली, तर हडपसर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सोडायला लागण्याची शक्यता आहे. इंदापूर येथील माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या उमेदवारीवरून ‘राष्ट्रवादी’च्या कार्यकत्यांनी बंडाचे निशाण फडकवले आहे. जुन्नर येथे विद्यमान आमदार अतुल बेनके यांना शरद पवार गटात प्रवेश देण्यावरून विरोध असून, तेथील काँग्रेसचे नेते सत्यशिल शेरकर यांना उमेदवारी देण्याची ‘राष्ट्रवादी’तील एका गटाची मागणी आहे.

## पिंपरी-चिंचवड शहराच्या लौकीकात आणखी एक मानाचा तुरा

# भारतातील पहिल्या संविधान भवनाची पायाभरणी !

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश भारतीय लोकशाहीचा पाया संविधान अर्थात राज्यघटना आहे. या राज्यघटनेचा प्रचार, प्रसार आणि जनजागृती व्हावी. या करिता देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारले जात आहे. त्याची पायाभरणी आज झाली. संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांना अभिमान वाटावा, असे संविधान भवन उभारले जाईल, असा विश्वास भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केला आहे.**



भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) च्या पेठ क्रमांक 11 मध्ये संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन आज करण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष नितीन लांडगे, संतोष लोंढे, विलास मडिगेरी, आरपीआयच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, हर्षवर्धन भन्ते, माजी नगरसेवक विकास डोळस, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, संतोष कांबळे, अंबरनाथ कांबळे, सागर आंघोळकर, बाबा त्रिभुवन, बाळासाहेब ओव्हाळ, आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर, बाळासाहेब भागवत, सखाराम बाप्पु डोळस,संदिपान झोबांडे, अजय निसर्गंध, कुंदन गायकवाड, चंद्रकांत डोळस, अमोल डोळस, भाऊसाहेब डोळस, विनोद (पिनु) डोळस, अनिकेत भुलाडे, मोशी आर पी आय अध्यक्ष, गजेद्रं गायकवाड, रविभाऊ गायकवाडअक्षय चव्हाण, प्रशांत बाराथे आदी उपस्थित होते.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, शहरात 2019 मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या माध्यमातून संविधान भवन उभारणीसाठी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर 'पीसीएनटीडीए'चे विलिनीकरण पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणामध्ये करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्प लांबणीवर पडला. महायुतीची सत्ता आल्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा या कामाला गती देण्यात आली. प्रस्तावित जागा 'पीएमआरडीए'कडून महानरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडेही आम्ही पाठपुरावा केला. आता संविधान भवनाचे भूमिपूजन झाले आहे, याचे विशेष समाधान आहे.

### पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब...

विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरीत होवून शहरात संविधान तथा राज्य घटनेचा प्रचार, प्रसार व्हावा. यासह जगभरातील लोकशाही देशाच्या घटनांचा अभ्यास करता यावा, असा संकल्प आहे. संविधान जागृती आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली होती. संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये साकारले जात आहे, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे, अशी प्रतिक्रिया आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

---

## चेन्नई एक्सप्रेस आणि गदग एक्सप्रेसला लोणावळ्यात आता थांबा!

## मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रयत्नांना यश

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पश्चिम महाराष्ट्रातील रहिवाशांमध्ये लोकप्रिय असलेली प्रसिद्ध चेन्नई एक्सप्रेस आणि आणि गदग एक्सप्रेस आता पर्यटन केंद्र असलेल्या लोणावळा येथे थांबणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळ तालुक्यातील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे. या बदलांचे आदेश मुंबई विभागाचे वरिष्ठ विभागीय व्यस्थापक ब्रजेश राय यांनी जारी केले आहेत. या दोन्ही एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळावा यासाठी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे.**




> "मावळमधील नागरिकांची चेन्नई एक्सप्रेस आणि गदग एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळावा अशी मागणी होती. त्यासाठी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन सतत पाठपुरावा केला. त्याला यश आले असून दोन्ही एक्सप्रेसला लोणावळ्यात थांबा मिळणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळमधील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे.
> – **श्रीरंग बारणे,**
> खासदार. मावळ.

पूर्वी दादर सेंट्रल ते चेन्नई सेंट्रलपर्यंत धावणारी चेन्नई एक्सप्रेस सुमारे 1,284 किलोमीटरचे अंतर कापून कल्याण जंक्शन, पुणे जंक्शन, सोलापूर, वाडी, रायचूर, गुंटकल जंक्शन, रेनिगुंटा जंक्शन आणि अरक्कोनम जंक्शन येथे थांबत असे. ट्रेन क्रमांक 12163 ची परतीची सेवा असून जी ट्रेन क्रमांक 12164 आहे. चेन्नई सेंट्रल येथून सुटते, दादर सेंट्रल येथे येते. आता एक्सप्रेसला लोणावळ्यातही थांबा असणार आहे.

त्याचप्रमाणे गदग एक्स्प्रेसही लोणावळा येथे थांबणार आहे. गदग एक्सप्रेस मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते गदगमधील गदग जंक्शन (जीडीजी) पर्यंत धावते. काही प्रमुख थांब्यांमध्ये दादर सेंट्रल, ठाणे रेल्वे स्टेशन, कल्याण जंक्शन, पुणे जंक्शन, कुर्डुवाडी जंक्शन, सोलापूर, विजयपुरा (विजापूर), बागलकोट जंक्शन, बदामी आणि गदग जंक्शन यांचा समावेश आहे. पश्चिम महाराष्ट्रातून दक्षिण भारतात, विशेषतः कर्नाटकात जाणाऱ्या लोकांसाठी ही एक सुप्रसिद्ध ट्रेन आहे. ट्रेन क्रमांक 11139 ची परतीची सेवा असून ट्रेन क्रमांक 11140 आहे. आता एक्सप्रेसला लोणावळ्यातही थांबा असणार आहे. लोणावळा स्थानक जोडल्याने मावळ तालुक्यातील लोकांना आता या महत्त्वाच्या ट्रेनमध्ये सहज प्रवेश मिळणार आहे.

चेन्नई एक्सप्रेस कल्याण जंक्शन येथे संध्याकाळी 7:27 वाजता पोहोचेल आणि 3 मिनिटांच्या थांब्यासह 7:30 वाजता निघेल. परतीची सेवा सकाळी 11:40 वाजता पोहोचेल आणि 5 मिनिटांच्या थांब्यासह 11:45 वाजता निघेल. ही एक्सप्रेस लोणावळ्याला रात्री 8.56 वाजता पोहोचेल आणि 2 मिनिटांच्या थांब्यासह 8.58 वाजता निघेल. परतीची सेवा दुपारी 12:30 पोहोचेल आणि 12:42 वाजता निघेल. गदग एक्सप्रेस कल्याण जंक्शन येथे रात्री 10:15 वाजता पोहोचेल आणि 1 मिनिटाच्या थांब्यासह लगेच निघेल. परतीची सेवा पहाटे 3.33 वाजता पोहोचेल आणि 5 मिनिटांच्या थांब्यासह 3.36 वाजता निघेल. ट्रेन 11:51 वाजता लोणावळ्याला पोहोचेल आणि 11:53 ला 2 मिनिटांच्या थांब्याने निघणार आहे. परतीची सेवा पहाटे 2.05 वाजता पोहोचेल आणि 2 मिनिटांच्या थांब्यासह 2.7 वाजता निघेल.

## ‘प्रधानमंत्री आवास’मधील 5 हजार

# सदनिकाधारांना अखेर दिलासा!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

### पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनकडून मानले आभार

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बोऱ्हाडेवाडी-मोशी येथील प्राधिकरण सेक्टर- १२ मध्ये उभारण्यात आलेल्या प्रकल्पातील तब्बल ४ हजार ८८३ सदनकिाधारकांवर चुकीच्या पद्धतीने आकारलेली मळिकतकर आकारणीत सुधारणा करण्याचा नरि्णय प्रशासनाने घेतला. त्यामुळे आवास योजनेतील सदनकिाधारकांना दलिासा मळिाला आहे.**



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पेठ क्रमांक १२, मौजे बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत गृहप्रकल्प १ व २ मधील सदनिका व दुकाने यांची मिळकत कर आकारणी बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिल्यापासून केली जात आहे. तशी बिलेही मिळकतधारकांना दिली आहेत. त्यामुळे सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून मिळकतकर आकारणी करावी, अशी मागणी स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने सदनिकाधारकांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे केली होती. यावर आमदार लांडगे यांच्या सूचनेनुसार, सदनिकाधारकांचे प्रतिनिधी आणि पीएमआरडीएचे अध्यक्ष डॉ. योगेश म्हसे यांची बैठक झाली होती. त्यावेळी मिळकतकर आकारणीमध्ये सुधारणा करण्याबाबत त्यांनी आश्वासन दिले होते. त्यानुसार, प्राधिकरण प्रशासनाने लेखी पत्र महानगरपालिका करसंकलन विभागाचे सहायक आयुक्तांना दिले. दरम्यान, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे आणि सामाजिक कार्यकर्ते शिवराज लांडगे यांच्या शिष्टमंडळाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांची भेट घेतली. महानगरपालिका करसंकलन विभागाकडून चुकीच्या पद्धतीने मिळकत कर आकारणी सुरू केल्याबद्दल सविस्तर चर्चा केली. तसेच, पीएमआरडीएच्या आयुक्तांनी दिलेले सुधारित कर आकारणीबाबतच्या पत्रानुसार तात्काळ कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी केली.

> “ ‘पीएमआरडीए’ प्रशासनाकडून महापालिका कर संकलन विभागाला पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थींना सदनिकांचा ताबा मिळाल्यापासून कर आकारणी करण्याबाबत पत्र प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे सोसायटी फेडरेशनच्या आणि सदनिकाधारकांच्या मागणीनुसार मिळकतकर आकारणीबाबत सुधारीत पावती देण्यात येतील.
>
> **–प्रदीप जांभळे-पाटील,** अतिरिक्त आयुक्त.

> “ प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्वसामान्य सदनिकाधारक लाभार्थींना बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यापासून केलेली मिळकतकर आकारणी चुकीची आणि अन्यायकारक होती. त्यामुळे सदर ५ हजार सदनिकाधारकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागला. पीएमआरडीए आणि महानगरपालिका अस्थापनांनी तसेच आमदार महेश लांडगे यांनी याकामी सकारात्मक भूमिका घेतली. त्यामुळे सदर सदनिकाधारकांना दिलासा मिळाला आहे.
>
> **– संजीवन सांगळे,**
> अध्यक्ष, चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

---

## पिंपरीतील भाजी मंडई व्यापाऱ्यांच्या ३५ वर्षांच्या संघर्षाला न्याय!

### परवानाधारक विक्रेत्यांना मिळाला निवारा; आमदार आण्णा बनसोडे यांचा पुढाकार

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी भाजी मंडई परिसरात गेली ३५ वर्षे सावित्रीबाई फुले भाजी व्यवसाय मार्गदर्शक संघ व त्यांचे सदस्य भाजी विक्रीचा व्यवसाय करत आहेत. सर्व भाजी विक्रेते हे परवानाधारक असून त्यांनी महानगरपालिका व स्थानिक राजकीय नेत्यांना वेळोवेळी निवारा मिळण्यासाठी पाठपुरावा करीत होते. अखेर त्यांना यश मिळाले.**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी भाजी मंडई मधील ३०० परवानाधारक भाजी विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपात पत्रा शेड गाळे बांधून दिले आहे. त्यामुळे प्रत्येक गाळ्यावरील आमदार अण्णा बनसोडे यांचा फोटो पाहून व शहरात लागलेल्या बॅनर मुळे आमदार अण्णा बनसोडे यांच्या राजकीय विरोधकांनी रान पेटवले. काही इच्छुक उमेदवारांनी कामाची उपयोगिता न पाहता त्याबाबत तक्रारी केल्या. मात्र, सर्व विरोधाला न जुमानता आमदार अण्णा बनसोडे यांनी 300 गाळ्याचे लोकार्पण केले. भर पावसात हजारो नागरिकांच्या उपस्थितीत आमदार अण्णा बनसोडे यांनी या गाळ्यांचे लोकार्पण केले. यावेळी माजी नगरसेवक संदीप वाघेरे, निलेश पांढरकर, सावित्रीबाई फुले भाजी व्यवसाय मार्गदर्शक संघाचे अध्यक्ष संतोष वडमारे, प्रमुख संघटक रमेश शिंदे, कार्याध्यक्ष गौतम रोकडे, प्रविण वडमारे, बाळासाहेब शिंदे व इतर परवानाधारक भाजी विक्रेते उपस्थित होते.

> “ काही नवीन चेहरे घेऊन फिरणाऱ्या विरोधकांना पिंपरी विधानसभा क्षेत्रातील कष्टकरी, हातावर पोट असणाऱ्या नागरिकांची परस्थिती याची जाणीव नाही. त्यामुळे फक्त राजकीय हव्यासापोटी फक्त विरोधाला विरोध म्हणून अपप्रचार करत आहेत. मात्र, जेव्हा कधी माझ्या कष्टकरी व्यापारी लोकांच्या हितासाठी काही चांगलं करायची वेळ येईल. तेव्हा मी मागे हटणार नाही.
>
> **– आण्णा बनसोडे,,**
> आमदार, पिंपरी विधानसभा.

### व्यापाऱ्यांच्या ‘हितासाठीच घेतला पुढाकार...

आमदार बनसोडे म्हणाले की, सर्व भाजी विक्रेते हे परवाना धारक आहेत. ते गेली 35 वर्षांपासून या ठिकाणी आपला व्यवसाय करत आहेत. त्यांची मागणी होती की आम्हाला गाळे बांधून द्यावेत सदर जागेवर महानगरपालिका भाजी मंडई बांधणार आहे व त्यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद देखील केली आहे. मात्र, कन्सल्टंट ने सादर केलेल्या डिझाईन नुसार सर्व परवाना धारकांना तिथे गाळा देणे शक्य नाही. त्यात भाजीपाला हे देखील तात्काळ नाशवंत होणारी गोष्ट असल्याने सर्व परस्थितीचा विचार करून सर्व परवाना धारकांना आहे. त्या ठिकाणी गाळे बांधून दिले आहेत.



## भूमिका

# नक्षलवादी- नायक की खलनायक?

**उंची बेताचीच. अपंगत्वामुळे कायम चाकाच्या खुर्चीचा आधार घ्यावा लागल्याने ती नेमकी किती हे कुणालाच ठाऊक नसलेली. डोळे भेदक. वाणीवर इंग्रजीचे प्रभुत्व. एकदा बोलू लागला की समोरच्यांनी ऐकतच राहावे असे वागणे आणि बोलण्यात डावेपण भिनलेले.**

ही ऐन दसऱ्याच्या दिवशी निधन झालेल्या आणि 'जहाल नक्षली' असा शिक्का बसलेल्या प्रा. जी. एन. साईबाबाची दर्शनी ओळख. नक्षल असल्याच्या आरोपावरून पकडला गेला तेव्हा दिल्ली विद्यापीठात इंग्रजीचा प्राध्यापक आणि जहाल डाव्यांचा 'आयडियालॉग' असलेला साईबाबा मूळचा आंध्रप्रदेशातील अमलापुरमचा. विद्यार्थीदशेपासून डाव्या चळवळीशी जोडल्या गेलेल्या या तरुणाने १९९१ मध्ये 'आंध्र पीपल्स रेझिस्टन्स फोरम' ही संघटना स्थापन केली. तेव्हा या राज्यात नक्षल चळवळ अतिशय प्रभावी होती. त्यांच्या हिंसाचाराने कळस गाठला होता. त्यांचीच समर्थित म्हणून ओळखल्या गेलेल्या या संघटनेने सरकारी यंत्रणांकडून दलित, शोषित, पीडितांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडायला सुरुवात केली ती मात्र हिंसाचारातून नव्हे तर, सनदशीर लोकशाही मार्गाने. त्या वेळी या राज्यात कोंडापल्ली सीतारामय्या नेतृत्व करत असलेल्या पीपल्स वॉर ग्रूपचा



बोलबाला होता. या कोंडापल्लींची दृष्टी मर्यादित. दंडकारण्याच्या बाहेरचा विचार न करणारी. यावरून गणपती व त्याच्यात मतभेदाला सुरुवात झाली. या चळवळीला देशव्यापी स्वरूप द्यायचे असेल तर विविध राज्यात शस्त्रे हाती घेऊन वेगवेगळ्या नावाने लढणाऱ्या संघटनांनी एकत्र येणे गरजेचे हा गणपतीचा विचार अंमलात आणण्यासाठी पुढाकार घेतला तो साईबाबाने. केवळ हैदराबादमध्ये राहून हे शक्य नाही हे लक्षात येताच त्याने दिल्ली गाठली व तेव्हाच्या बिहारमध्ये सक्रिय असलेल्या 'माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर' या संघटनेशी (एमसीसी) बोलणी सुरू केली.दीर्घकाळ चर्चेचा कीस पाडल्यावरच निर्णय घेणे हे डाव्यांचे वैशिष्ट्य. त्यामुळे १९९५ पासून सुरू झालेल्या या वाटाघाटींनी मूर्त स्वरूप घेतले तोवर सप्टेंबर २००४ उजाडला. यातून आकाराला आला भाकप (माओवादी) हा पक्ष. तोवर नक्षली म्हणजे हातात बंदुका घेऊन हिंसाचार करणारे अशीच या चळवळीची देशभर प्रतिमा होती. सरकारे व समाज याच नजरेतून त्यांच्याकडे बघत होते. या चळवळीमागे एक निश्चित विचार आहे व त्याला राजकीय अधिष्ठान आहे हे अनेकांना ठाऊक नव्हते. हा विचार नागरी समाजात रुजवायचा असेल तर समर्थित संघटनांचे देशभर जाळे विणणे गरजेचे आहे हे सर्वप्रथम लक्षात आले ते साईबाबाच्या. त्यामुळे विलीनीकरणानंतर त्याने सर्वप्रथम स्थापना केली ती ऑल इंडिया रेझिस्टन्स फोरमची. त्याचा सचिव झाला एमसीसीचा राजकिशोर, तर उपसचिव साईबाबा. याच काळात देशात जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले होते. त्याला विरोध करण्यासाठी समाजवादी व डाव्यांनी 'वर्ल्ड सोशल फोरम' स्थापन केलेले होते. त्यात सहभागी होण्याचे निमंत्रण साईबाबालाही होते, पण ते त्याने धुडकावले व देशभरातील आदिवासींना एकत्र आणून मुंबईत 'मुंबई रेझिस्टन्स' या नावाचा स्वतंत्र कार्यक्रम ठेवला. नेमकी याच काळात राजकिशोरला अटक झाली. असे काही घडले रे घडले की संघटनेचे नाव त्वरीत बदलणे ही नक्षलींची पद्धत. यातून आकाराला आली 'रिव्होल्यूशनरी डेमोक्रॅटिक फ्रंट' (आरडीएफ) ही २००५ सालची घटना. नक्षलींचे शहरी भागातील स्वरूप कसे असेल याचा पायाच या फ्रंटने घालून दिला. या चळवळीसाठी काम करणाऱ्या दोनशेच्या वर समर्थित संघटना देशभर कार्यरत होत्या. त्यांना या 'फ्रंट'खाली एकत्र आणले ते साईबाबाने. तो एवढ्यावरच थांबला नाही तर शहरात काम करण्याची पद्धत कशी असेल, कुणी कोणते काम करायचे, त्याचे स्तर काय असतील, प्रत्येक स्तरावर नेतृत्त्व कुणाकडे असेल, याची रचना साईबाबाने आखली. त्यातून आकाराला आले नक्षलींचे 'शहरी काम के बारे मे' हे पुस्तक. याचाही जनक साईबाबाच. एवढेच नाही तर त्याने दिल्लीत असल्याचा फायदा घेऊन जगभरातील फुटीरतावादी समर्थित संघटना लोकशाहीच्या मार्गाने शहरी भागात असंतोष निर्माण करताहेत हे सरकारच्या लक्षात आले; पण कारवाई कशी करावी

## संपादकीय »

# दशमीचा दुभंगानंद!

***महाराष्ट्रातील यंदाच्या विजयादशमीने दिल्लीकरांस नक्कीच अधिक समाधान दिले असणार...***

आजच्या महाराष्ट्रासमोरची सर्वात गंभीर समस्या कोणती? अर्थव्यवस्थेची स्थिती आणि वाढती कर्जे, कायदा-सुव्यवस्थेचा अभाव, अन्य राज्यांकडून वाढती स्पर्धा, खेळासकट अन्य अनेक क्षेत्रांत होणारी महाराष्ट्राची पीछेहाट, शहरांचे बकालीकरण... हे सर्व वा आणखी काही मुद्दे समस्या ठरत नाहीत; असे नाही. या समस्या आहेतच. पण या सर्व समस्यांचे मूळ आहे ते महाराष्ट्राचे अत्यंत वेगाने होणारे अंतर्गत विलगीकरण. या राज्याचे झपाट्याने होत चाललेले कप्पे. हे कप्पे आर्थिक तर आहेतच. पण आर्थिक कप्पे कायम असतातच आणि काही अंशी असणारच. पण आजच्या महाराष्ट्रासमोरचे खरे आव्हान आहे ते वाढता सामाजिक दुभंग; हे. कसे; ते समजून घेणे आवश्यक आहे. या दुभंग विश्लेषणाचे वरवरचे लक्षण म्हणजे विजयादशमीच्या मुहूर्तावर वाढू लागलेले विविध मेळावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ साली नागपुरात १४ ऑक्टोबरला बौद्ध धर्म स्वीकारला.

**जम्मू-काश्मीरच्या विधानसभा निवडणुकीत 'नॅशनल कॉन्फरन्स' आणि काँग्रेसच्या आघाडीला बहुमत मिळाले हे बरे झाले. 'नॅशनल कॉन्फरन्स'ची अडवणूक करण्याचा घाट घालणाऱ्या 'दिल्लीकरां'ना काश्मीर खोऱ्यातील मतदारांनीच धडा शिकवला! नॅशनल कॉन्फरन्स (एनसी) हा पक्ष मुख्य प्रवाहातील राजकीय पक्ष आहे.**

# काश्मीरच्या जनमताचा 'राष्ट्रवादी' कौल!

जम्मू-काश्मीरमध्ये तब्बल दहा वर्षांनी होत असलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये 'एनसी'ने देशातील सर्वांत जुन्या राष्ट्रीय पक्षाशी युती करून राष्ट्रवादी भूमिका घेतली होती. असे असतानाही 'एनसी'ची घोडदौड रोखण्यासाठी आखलेली रणनीती खरे तर लोकशाहीविरोधी म्हटली पाहिजे. काश्मिरी मतदारांच्या शहाणपणामुळे 'एनसी'ला धूळ चारण्याचे मनसुबे मोडून पडले. काश्मीर खोऱ्यामध्ये लोकांनी मत देण्यासाठी फक्त लांबलचक रांगाच लावल्या नाहीत, तर हुशारीने मतदान करून विभाजनवाद्यांना चुचकारणाऱ्या 'रणनीतीकारां'ना पुन्हा दिल्लीला पाठवून दिले!जम्मू-काश्मीरमध्ये त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात आली तर सर्वसमावेशक सरकार स्थापन होईल, काश्मीर खोरे आणि जम्मू विभागालाही समसमान प्रतिनिधित्व मिळेल. त्यातून राष्ट्रीयत्वाचा संदेश देशस्तरावरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर दिला जाईल, असाही प्रचार केला गेला होता. म्हणूनच कदाचित जम्मू-काश्मीरमध्ये



कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही असे म्हटले जात असावे. 'एनसी'ने काँग्रेसशी आघाडी केली असली तरी त्रिशंकू अवस्थेत सरकार बनवण्यासाठी 'एनसी' भाजपशी युती करेल, असा छातीठोकपणे दावा करणारे कमी नव्हते. मतदारांनी 'एनसी'वर तशी वेळ येऊ दिली नाही. बहुमतापर्यंत कोणीच पोहोचले नसते तर भाजपकेंद्रित सरकार स्थापन होण्याची शक्यता अधिक होती. भाजपचे सरकार सत्तेवर आले असते तर त्याचे काश्मीर खोऱ्यात काय परिणाम झाले असते हे सांगण्याची गरज नाही. भाजपने 'एनसी'ला बरोबर घेऊनच सरकार बनवले असते असे नाही. 'एनसी'ला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्या असत्या तर खोऱ्यामध्ये 'पीडीपी', विभाजनवादी इंजिनीअर रशीद यांची अवामी इत्तेहाद पार्टी, जमात-ए-इस्लामी या धर्मांध मुस्लीम संघटनेने उभे केलेले अपक्ष अशा सगळ्या विजयी गोतावळ्यांना घेऊन भाजपचे सरकार बनले असते. कदाचित मुस्लीम मुख्यमंत्री म्हणून गुलाम नबी आझादांनाही संधी मिळाली असती. 'जमात' ही कधीच राष्ट्रवादी संघटना नव्हती, इंजिनीअर रशीदने 'आझादी'ची मागणी कधीही सोडलेली नाही. मुफ्तींच्या 'पीडीपी'चा जन्मच 'एनसी'ला आळा घालण्यासाठी झाला होता. 'पीडीपी'चे राजकीय अस्तित्व 'जमात'च्या पाठिंब्यावर अवलंबून होते. या सगळ्या विभाजनवाद्यांना आणि आझादीवाल्यांना कडाडून विरोध केला तो 'एनसी'नेच. त्याच 'एनसी'च्या पायात पाय घालण्याची चाल ओळखून मतदारांनी 'एनसी'ला भरघोस मते दिली. ना 'जमात', ना इंजिनीअर, ना 'पीडीपी'ला 'किंग मेकर' बनू दिले. काश्मीर खोऱ्यातील मतदार किती परिपक्व आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# विधानसभेच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का!

## हिरामण खोसकरांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

।बारामती।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक पुढील काही दिवसांमध्ये जाहीर होणार आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. अनेक नेत्यांचे दिल्ली दौरे सुरु आहेत, तर काही नेते राज्यातील विविध मतदारसंघात दौरे करत कामाचा आढावा घेत आहेत. यातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक नेते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही आपल्याला पाहायला मिळत आहे. आता राज्याच्या राजकारणातील आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.**





इगतपुरीचे काँग्रेसचे विद्यमान आमदार हिरामण खोसकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत आमदार हिरामण खोसकर यांचा पक्षप्रवेश पार पडला आहे. दरम्यान, आमदार हिरामण खोसकर यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे."इगतपुरीचे आमदार आणि आदिवासी समाजाचे नेते हिरामण खोसकर यांनी आज राष्ट्रवादीचे विकासाभिमुख विचार स्वीकारत माझ्या आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार खोसकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राज्य सरकारच्या माध्यमातून आम्ही चालवलेल्या कामांची व लोकोपयोगी योजनांची ही पोचपावती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस परिवारात मी सर्वांचं मनःपूर्वक स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देतो", असं अजित पवारांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. इगतपुरीचे आमदार आणि आदिवासी समाजाचे नेते श्री. हिरामण खोसकर यांनी आज राष्ट्रवादीचे विकासाभिमुख विचार स्वीकारत माझ्या आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार खोसकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे... दरम्यान, हिरामण खोसकर यांनी काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट देखील घेतली होती. त्यांनी ही भेट का घेतली? यासंदर्भात त्यांनी प्रतिक्रियाही दिली होती. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून हिरामण खोसकर हे काँग्रेसवर नाराज असल्याचीही चर्चा होती. तसेच काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग केल्याची चर्चा होती. यामध्ये आमदार हिरामण खोसकर यांचंही नाव चर्चेत आलं होतं. मात्र, त्यांनी हा आरोप फेटाळून लावला होता. यातच क्रॉस वोटिंग केलेल्या आमदारांना काँग्रेस विधानसभा निवडणुकीत तिकीट देणार नसल्याचं बोललं जात होतं. यातच आता हिरामण खोसकर यांनी काँग्रेस पक्षाला सोडत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. इगतपुरीचे काँग्रेसचे विद्यमान आमदार हिरामण खोसकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत मुंबईत आमदार हिरामण खोसकर यांचा पक्षप्रवेश पार पडला आहे. दरम्यान, आमदार हिरामण खोसकर यांनी ऐन निवडणुकीच्या तोंडावर पक्षाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे."इगतपुरीचे आमदार आणि आदिवासी समाजाचे नेते हिरामण खोसकर यांनी आज राष्ट्रवादीचे विकासाभिमुख विचार स्वीकारत माझ्या आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आमदार खोसकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राज्य सरकारच्या माध्यमातून आम्ही चालवलेल्या कामांची व लोकोपयोगी योजनांची ही पोचपावती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस परिवारात मी सर्वांचं मनःपूर्वक स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देतो"इगतपुरीचे आमदार आणि आदिवासी समाजाचे नेते श्री. हिरामण खोसकर यांनी आज राष्ट्रवादीचे विकासाभिमुख विचार स्वीकारत माझ्या आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत आपल्या प्रमुख सहकाऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

### क्रॉस वोटिंग केल्याची चर्चा

आमदार खोसकर यांचा पक्षप्रवेश म्हणजे... दरम्यान, हिरामण खोसकर यांनी काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट देखील घेतली होती. त्यांनी ही भेट का घेतली? यासंदर्भात त्यांनी प्रतिक्रियाही दिली होती. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून हिरामण खोसकर हे काँग्रेसवर नाराज असल्याचीही चर्चा होती. तसेच काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या विधान परिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या काही आमदारांनी क्रॉस वोटिंग केल्याची चर्चा होती.

# केसरकर यांच्याविरोधात भाजपने वाचला पाढा

## भाजपने मैत्रीपूर्ण लढत द्यावी–माजी आमदार राजन तेली

।अमरावती।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिपक केसरकर यांच्या धमक्यांना घाबरत नाही. गेली १५ वर्षे आमदार व ८ वर्षे मंत्री असूनही सावंतवाडी मतदारसंघाचा विकास झाला नाही, केसरकर यांनी मतदारसंघ व भाजपवर सतत अन्याय केला आहे. त्यामुळे आमदार बदलला पाहिजे. आमचं ठरलंय, विधानसभा निवडणूक लढवायची आणि जिंकायचं, भाजपने मैत्रीपूर्ण लढत द्यावी.**



अन्यथा तुम्हाला विचारून मतदारसंघात परिवर्तन घडवून आणण्यासाठी भूमिका घेतली जाईल असे सावंतवाडी विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे प्रमुख, माजी आमदार राजन तेली यांनी जाहीर केले. सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात समन्वयक माजी आमदार राजन तेली, महिला जिल्हाध्यक्ष श्वेता कोरगावकर, एकनाथ नाडकर्णी, तालुका मंडळ अध्यक्ष रवींद्र मडगावकर, वेंगुर्ले अध्यक्ष सुहास गवंडळकर, शितल राऊळ, पंकज पेडणेकर, आदी उपस्थित होते.तेली म्हणाले, दीपक केसरकर सुरुवातीला पालकमंत्री होते तेव्हापासून त्यांनी वारंवार भाजपवर अन्याय केला आहे. भाजप पक्षाच्या बांधणीसाठी मी पक्षाचा बळी ठरलो. आम्ही निधी आणतोय, केसरकर नारळ फोडताहेत. आंबोली, गेळे येथील कबुलायतदार गावकर जमीन प्रश्नावर भाजपने लोकांना न्याय दिला.

### मला अशा धमक्या देऊ नका

केसरकर फक्त मी केलं म्हणतात, आम्ही कधी म्हणणार? ताज पंचतारांकित हॉटेल प्रकल्पाला शेतकऱ्यांनी जागा दिली. ते ३२ वर्षे झगडताना पाहिले. भूमिपुत्रांना न्याय मिळवून द्यावा. पर्यटनमंत्री गिरीश महाजन स्वतः बोलले. केसरकर यांचा पळपुटेपणा लोकांनी पाहिला. केसरकर स्वतःच्या स्वार्थासाठी काम करत आहेत. निवडणूक तोंडावर असताना घोषणा करत दिखाऊपणा दाखवत आहेत. मी दिपक केसरकर यांचे काम करणार नाही.केसरकर यांना उद्देशून राजन तेली म्हणाले, मला संघर्ष करायची सवय आहे. मला अशा धमक्या देऊ नका.

# भारताने कॅनडाला पुन्हा फटकारलं!

## कॅनडाच्या सहा राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि कॅनडामध्ये जवळपास वर्षभरापासून तणाव आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने वर्षभरापूर्वी केला होता. मात्र, भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावले होते. तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध बिघडले आहेत. यातच कॅनडाने पुन्हा एकदा या प्रकरणाचा उल्लेख करत भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा या प्रकरणाच्या तपासात सहभाग असल्याचा आरोप केला, या आरोपानंतर भारताने एक पत्रक जारी करत कॅनडाने केलेले आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. तसेच कॅनडा सरकारने केलेल्या आरोपाला उत्तर देताना हा ट्रुडो सरकारचा हा राजकीय अजेंडा असल्याचं म्हणत भारताने कॅनडाला फटकारलं.**



यानंतर आता भारताने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, कॅनडातील भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांच्यावर कॅनडाने केलेल्या आरोपानंतर भारताने याची गंभीर दखल घेत उच्चायुक्त संजय वर्मा यांना परत मायदेशी बोलावले आहे. तसेच यावेळी भारताने कॅनडाच्या सरकारवर विश्वास नसल्याचंही म्हटलं. परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटलं की, सध्याच्या कॅनडा सरकारच्या सुरक्षेच्या खात्रीसंदर्भातील वचनबद्धतेवर आम्हाला विश्वास नाही. त्यामुळे भारत सरकारने उच्चायुक्त आणि इतर अधिकाऱ्यांना परत बोलावण्याचा निर्णय घेतला असल्याचं म्हटलं.याबरोबरच कॅनडाने केलेल्या आरोपाबाबत भारताने असंही म्हटलं आहे की, कॅनडातील ट्रुडो सरकार कोणतेही पुरावे सादर करत नाही. तसेच कोणतेही पुरावे सादर न करता सातत्याने बिनबुडाचे आरोप करत आहे. त्यामुळे हा ट्रूडो सरकारचा राजकीय अजेंडा असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान, यानंतर आता भारत सरकारने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. १९ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ११:५९ पर्यंत किंवा त्यापूर्वी भारत सोडण्याचे आदेश दिले आहेत. यासंदर्भात भारताने पत्रक जारी केले आहे.भारत सरकारने कॅनडाच्या उच्चायुक्तांसह ६ राजनैतिक अधिकाऱ्यांना भारत सोडण्याचे आदेश जारी केले आहेत. यामध्ये कार्यवाहक उच्चायुक्त स्टीवर्ट रॉस व्हीलर, उपउच्चायुक्त पॅट्रिक हेबर्ट, प्रथम सचिव मेरी कॅथरीन जोली, प्रथम सचिव लॅन रॉस डेव्हिड ट्राइट्स, प्रथम सचिव ॲडम जेम्स चुइप्का, प्रथम सचिव पॉला ओरजुएला यांना १९ ऑक्टोबर २०२४ रोजी पर्यंत भारत सोडण्याच आदेश दिले आहेत.भारत आणि कॅनडामधील तणाव जवळपास वर्षभरापासून वाढलेला आहे. खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा हात असल्याचा आरोप कॅनडाने काही महिन्यांपूर्वी केला होता, तर भारताने कॅनडाचे आरोप फेटाळून लावेल होते. मात्र, तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध बिघडलेल्या चर्चा आहेत. आता नुकतेच कॅनडाने एका प्रकरणाच्या तपासात भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा सहभाग असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. यावरून आता भारताने एक पत्रक प्रसिद्ध करत कॅनडाला फटकारलं आहे. भारताने कॅनडाचा हा आरोप पूर्णपणे फेटाळून लावला आहे. कॅनडाने एका प्रकरणाच्या तपासात भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा आणि इतरांचा सहभाग असल्याचा केलेला आरोप हा बेताल असल्याचं म्हणत फेटाळून लावला आहे. तसेच ‘ट्रूडो सरकारचा हा राजकीय अजेंडा आहे, असं म्हणत भारताने कॅनडाला पुन्हा एकदा फटकारलं आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आज कॅनडाच्या राजनैतिक संप्रेषणावर भारतीय उच्चायुक्त आणि इतर काहींना एका प्रकरणात जोडल्याबद्दल कठोर शब्दात प्रतिक्रिया जारी केली.

### बेकायदेशीरपणे कॅनडामध्ये प्रवेश

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं की, “आम्हाला काल कॅनडाकडून एक संदेश प्राप्त झाला. त्यामध्ये म्हटलं आहे की, कॅनडातील भारताचे उच्चायुक्त आणि इतर काहीजण एका प्रकरणाच्या तपासात सहभागी असल्याचा आरोप केला. पण भारत सरकार हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने निवेदनात म्हटलं की, “ट्रूडो सरकारने माहिती असूनही कॅनडातील भारतीय मुत्सद्दी आणि समुदायाच्या नेत्यांना धमकावणाऱ्या आणि धमकावणाऱ्या हिंसक कट्टरपंथी आणि दहशतवाद्यांना जागा दिली. यामध्ये भारतीय नेत्यांना जीवे मारण्याच्या धमक्यांचाही समावेश आहे. बेकायदेशीरपणे कॅनडामध्ये प्रवेश केलेल्या काही लोकांना लवकर नागरिकत्व देण्यात आले.

---

# सलमानसह १० जण बिश्नोई टोळीच्या निशाण्यावर!


## बिश्नोई टोळीचा महाराष्ट्रातही हातपाय पसरण्याचा प्रयत्न

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी मंत्री झियाउद्दिन अब्दुल रहीम सिद्दीकी उर्फ बाबा सिद्दीकी यांच्या हत्येत कुख्यात गुंड लॉरेन्स बिष्णोई टोळीच्या सहभागाच्या चर्चेमुळे पंजाब, राजस्थान आणि हरियाणामध्ये सक्रीय असलेली लॉरेन्स बिश्नोई टोळी महाराष्ट्रातही हातपाय पसरण्याचा प्रयत्न करत असल्याचं निदर्शनास आलं आहे. सलमान खानसह १० जण या टोळीच्या टार्गेटवर आहे. नॅशनल हेराल्डने ही दहा जणांची यादी प्रसिद्ध केली आहे.**





अमेरिका, कॅनडा येथून या टोळीचा कारभार चालवणाऱ्या अनमोल बिष्णोईने यापूर्वी अभिनेता सलमान खान याच्या घरावरही गोळीबार घडवून आणला होता. याद्वारे त्याने मुंबईतील व्यावसायिक, बॉलिवूड कलाकार व चित्रपट निर्मात्यांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. समाजमाध्यमांचा वापर करून ही टोळी राज्यात हातपाय पसरत आहे. दरम्यान, लॉरेन्स बिश्नोई टोळीने अनेक धनाढ्य लोकांकडे खंडणीची मागणी केली आहे. अभिनेता सलमान खानसह देशभरात अनेक लोक या टोळीच्या टार्गेटवर आहेत. काळवीट शिकार प्रकरणात सलमान खानला मुक्त केल्यानंतर बिश्नोई टोळीने सलमानला धमकी दिली होती. सलमान खानने काळवीट मारलं आहे. त्याला सर्व प्रकरणांमधून दोषमुक्त करण्यात आलंय. त्याने काळवीटाची शिकार करुन खूप मोठी चूक केली आहे. आम्ही उघडपणे सांगतोय की पुढे आम्ही सलमानचा कार्यक्रम करणार. यामध्ये कोणतीच शंका नाही,असा इशारा बिष्णोईने टोळीचा प्रमुख असणाऱ्या लॉरेन्स विष्णोईचा मानलेला भाऊ राजवीर सोपूने दिला होता. तेव्हापासून ही टोळी सलमानच्या मागे लागली आहे. सलमान खानप्रमाणे इतरही अनेकजण या टोळीच्या टार्गेटवर आहे. त्यामध्ये शगूनप्रीत, पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला याचा व्यवस्थापक; मनदीप धालीवाल, कुख्यात गुंड लकी पटियालचा साथीदार; कुख्यात गुंड कौशल चौधरी; कुख्यात गुंड अमित डागर; सुखप्रीतसिंग बुढ्ढा; कुख्यात गुंड लकी पटियाल; कुख्यात गुंड रम्मी मसाना, गोंडार टोळीचा सदस्य; गुरप्रीत शेखो, गोंडार टोळीचा सदस्य यांचा समावेश आहे. लॉरेन्स बिश्नोईने एनआयएला सांगितलं होतं की मनदीपने मुद्दुखेराच्या मारेकऱ्यांना मदत केली होती.

### प्रवीण लोणकरला पोलीस कोठडी

पुणे:बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणातील तिसरा आरोपी प्रवीण लोणकर याला आज न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. न्यायालयाने प्रवीण लोणकरला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.त्यानंतर पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. शुबू हा अकोला जिल्ह्याच्या अकोट येथील शुभम रामेश्वर लोणकर आहे, अशी माहिती पुढे आली होती. या दृष्टीने पोलीस तपास करत होते. पोलिस त्याच्या अकोट येथील घरी दाखल झाले. मात्र, घराला कुलूप होतं.

# अभिषेक दुर्गा अडकणार लग्नबंधनात; मालिकेत नवीन वळण

काही मालिका कमी कालावधीत प्रेक्षकांच्या मनात घर करतात. त्यापैकी एक कलर्स मराठी वाहिनीवर प्रदर्शित होणारी 'दुर्गा' ही मालिका आहे. आता या मालिकेत नवीन वळण आले असून दुर्गा(DURGA) आणि अभिषेकच्या लग्नाची तयारी सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.मालिकेत सगळीकडे आनंदाचे वातावरण असले तरीही दुर्गा अस्वस्थ आहे. आपली खरी ओळख अभिषेकला कळावी यासाठी दुर्गा त्याला व्हॉइस नोट पाठवते. अभिषेकला खरे सांगितल्यामुळे तिला मनावरचा भार हलका झाल्यासारखे वाटते. परंतु ती व्हॉइस नोट अभिषेकचा मोठा भाऊ ऐकतो आणि तो तिला रिप्लाय देतो. त्यानंतर आपल्या आयुष्यात मोठे वळण येणार आहे, याची जाणीव दुर्गाला होते.रूमानी खरे 'दुर्गा' मालिकेतील नव्या ट्रॅक विषयी म्हणाली, "लग्नासाठी दुर्गा खूप उत्साही आहे. मात्र सगळ्या गोष्टी फार लवकर घडल्या की यावर विचार करायला तिला वेळच मिळाला नाही. सर्वात आधी तिला समजले की, अभिषेक हा दादासाहेबांचा मुलगा आहे, हे सत्य स्वत:ला समजावून सांगणे कठीण



होते. मात्र ही गोष्ट मान्य करत जेव्हा त्याच्यापासून लांब जाण्याचे ठरवले तेव्हा त्याचा अपघात झाला." "त्यानंतर दुर्गाला लक्षात आले की, आपण काहीही केले तरी अभिषेकपासून दूर जाऊ शकत नाही. दुर्गा आणि अभिषेक यांच्यात गोष्टी सुरळीत होताच आईसाहेबांनी घोषित केले आम्ही तुमचे लग्न लगेच लावून देतो. त्यामुळे या सगळ्या गोष्टी लक्षात यायलाच तिला खूप वेळ लागला आहे. दुर्गा अभिषेकवर मनापासून प्रेम करते. तरीसुद्धा कुठेतरी हा विचार आहे की, तो दादासाहेबांचा मुलगा आहे. आपण लग्न करुन त्याच घरात जाणार आहोत, ज्या घराचा आपण नाश करण्याचे ठरवले आहे. लग्नाबरोबरच दुर्गाच्या डोक्यात आईचासुद्धा विचार आहे.

## सुंदरी' मालिकेत खरातची एन्ट्री

या कार्यक्रमामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणारी अभिनेत्री वनिता खरात (VANITA KHARAT) ही आता एका नव्या मालिकेमधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. नुकताच 'सुंदरी' (SUNDARI) या मालिकेचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या प्रोमोमधील वनिताच्या लूकनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. सुंदरी या मालिकेच्या प्रोमोमध्ये दिसत आहे की, सुंदरी ही साहेब प्लाझा तोडण्याचा आदेश देते. तेवढ्यात वनिता खरातची एन्ट्री होते. काळी साडी, काळी टिकली आणि ऑक्लाइडचे दागिने अशा लूकमध्ये वनिता दिसत आहे. वनिताचा हा लूक पाहिल्यानंतर लक्षात येत आहे की, सुंदरी या मालिकेत ती खलनायिकेची भूमिका साकारत आहे. अनेक नेटकऱ्यांनी कमेंट करुन वनिताला तिच्या या मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. एका नेटकऱ्यानं कमेंट केली,"मला वाटतं वनिता खरातने अशाच नवनवीन भूमिका साकारायला हरकत नाही . या मलिकेत ती खलनायकाची भूमिका खुप सुंदर साकारणार आहे, असं प्रोमो पाहून कळत आहे." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "फायर है तू" तसेच सुयश टिळक,पृथ्वीक प्रताप, प्रियदर्शिनी इंदलकर यांनी देखील सुंदरी या मालिकेच्या प्रोमोला कमेंट करुन वनिताला तिच्या आगामी मालिकेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुंदरी या मालिकेत अभिनेत्री आरती बिराजदार ही प्रमुख भूमिका साकारते. आता सुंदरी या मालिकेत वनिताची एन्ट्री झाल्यानंतर पुढे काय काय घडणार? हे पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## मी वाहणारी नदी : प्रियांका



बॉलिवूडसह हॉलिवूडवर राज्य केलं आहे. अभिनेत्रीचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणा ठरतो. प्रियंकाने नुकतीच 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'मध्ये हजेरी लावली. त्यावेळी तिने तिचं आयुष्य, करिअर, अनुभव यासर्व गोष्टींबद्दल भाष्य केलं. त्यावेळी "मी वाहणारी नदी आहे, एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे", असं प्रियंका म्हणाली. 'जियो मामी मुंबई फिल्म फेस्टिव्हल'दरम्यान प्रियंका चोप्रा म्हणाली,"मला तलावासारखं व्हायचं नाही. मी वाहणारी नदी आहे. एक दिवस समुद्र होण्याची माझी इच्छा आहे". प्रियंकाचा आज जागतिक पातळीवर दबदबा आहे. मिस वर्ल्ड, नॅशनल अ‍ॅवॉर्ड विजेती बॉलिवूड अभिनेत्री, हॉलिवूड स्टार, गायिका, निर्माती, लेखिका, उद्योगपती सारख्या विविध क्षेत्रांत प्रियंकाने आपल्या कामाचा झेंडा रोवला आहे. प्रियंका चोप्रा म्हणाली,"सिनेसृष्टीत पदार्पण करण्याचा निर्णय माझा नव्हता. या क्षेत्रात मला जबरदस्तीने ढकललं गेलं आहे. त्यानंतर सहकलाकारांकडून अभिनय म्हणजे नक्की काय हे मी शिकले आहे. एखाद्या गोष्टीत मी 100% देत असते. दररोज सर्वोत्कृष्ट काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. यशाचं फळ मिळतचं. दररोज चांगलं काम केल्यास लवकरच तुम्ही यशस्वी व्हाल.". प्रियंका चोप्रा पुढे म्हणाली,"प्रत्येक प्रोजेक्टमध्ये मी खूप मेहनत घेत असते. संहितेवर काम केल्यानंतरच मी सेटवर जाते. कलाकाराचं काम हे अ‍ॅक्शन आणि कटच्या मध्ये सुरू असतं. पण एखाद्या प्रोजेक्टसाठी 200 लोक मेहनत घेत असतात. तुमचा चेहरा फक्त त्यांचं प्रतिनिधित्व करत असतो. त्यामुळे माझा कोणता सिनेमा चालला नाही तर नक्कीच मला वाईट वाटतं". प्रियंका चोप्राला हॉलिवूडमध्येही बॉलिवूडसारखं काम करायचं आहे. ती म्हणते,"हिंदी मनोरंजनसृष्टीत मी 15 वर्षे काम केलं आहे. तर 6-8 हॉलिवूडपटांमध्ये मी झळकले आहे. पण बॉलिवूडमध्ये जसं विविधतापूर्ण काम करता आलं आहे. तसंच मला हॉलिवूडमध्येही करायचं आहे. स्वत:ला चॅलेंज द्यायला मला आवडेल". 'अंदाज' सिनेमाच्या यशानंतर प्रियंका चोप्राने कधीच मागे वळून पाहिलं नाही. प्लॅन, किस्मत, असंभव सारख्या सिनेमांत तिने काम केलं. 2005 मध्ये आलेला 'मुझसे शादी करोगी' या सिनेमातील प्रियंकाच्या अभिनयाला प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. तिचा हा सिनेमा सुपरहिट ठरला. 2016 साली प्रियंकाने हॉलिवूडमध्ये

## 'परि, स्वरा ते कियारा!

करवा चौथ हा एक महत्त्वाचा सण आहे. प्रामुख्याने उत्तर भारतातील विवाहित महिलांद्वारे साजरा केला जातो. करवा चौथ हा सण विवाहित महिलांसाठी अतिशय महत्वाचा असतो. यंदा करवा चौथ हा सण 1 नोव्हेंबरला म्हणजेच उद्या साजरा होणार आहे. सर्वत्र महिला या सणाच्या तयारीला लागल्या आहेत. त्यातच लग्नानंतरचा करवा चौथ हा खुपच खास असतो. आता बी टाऊनमध्येही अशा कही अभिनेत्री आहेत ज्यांनी या वर्षी 2023 मध्ये लग्न केले आहे. या अभिनेत्री आपल्या लग्नानंतरच्या पहिल्या करवा चौथसाठी खूप उत्सुक आहेत. चला तर मग जाणून घेऊया या वर्षी कोणती बॉलिवूड अभिनेत्री आपली पहिली करवा चौथ साजरी करणार आहे. यात पहिल नाव येत ते अभिनेत्री कियारा अडवाणीचे. कियाराने सिद्धार्थ मल्होत्रासोबत फेब्रुवारी 2023 मध्ये लग्न केले आहे. कियारा तिचा पहिला करवा चौथ साजरा करण्यासाठी तयार आहे. 'शेरशाह' चित्रपटाच्या सेटवर दोघांची लव्हस्टोरी सुरु झाली.



## हॉलिवूडची गायिका सेलेना गोमेझ झाली भावुक?

हॉलिवूडची प्रसिद्ध गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ नेहमीच तिच्या वैयक्तिक आयुष्य किंवा व्यावसायिक आयुष्यामुळे चर्चेत असते. सेलेना सोशल मिडियावरही चांगलीच सक्रिय असते. ती तिचे फोटो आणि व्हिडिओ चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या चाहत्यांची संख्या काही कमी नाही. भारतातही तिच्या गाण्यांचा चाहता वर्ग आहे. मात्र आता सेलेनाच्या चाहत्यांसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. लोकप्रिय गायिका आणि अभिनेत्री सेलेना गोमेझ सध्या तिच्या एका पोस्टमुळे चर्चेत आहे. तिने तिच्या इंस्टास्टोरीमधून जाहिर केले की ती सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. पण तिने अचानक एवढा मोठा निर्णय का आणि कसा घेतला हे देखील सेलेनाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे. सेलेनाने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर लिहिले आहे की, 'मी सोशल मीडियापासून ब्रेक घेत आहे. कारण जगात सुरू असलेली दहशत, द्वेष, हिंसा आणि दहशत पाहून माझे हृदय तुटत आहे. लोकांचा छळ आणि हत्या किंवा कोणत्याही एका समूहाप्रती द्वेषा हे कृत्य भितीदायक आहे. आपण सर्व लोकांचे, विशेषत: लहान मुलांचे रक्षण केले पाहिजे. हा हिंसाचार एकदाचा थांबवावा. माझे शब्द प्रत्येकासाठी किंवा हॅशटॅगसाठी कधीही पुरेसे नसल्यास मला माफ करा. निष्पाप लोकांना दुखापत होताना पाहणं मला सहन होत नाही आहे.

याचा मला खुप त्रास होत आहे. यामुळे मी आजारी पडत आहे. मी हे जग बदलू शकली असती तर . पण एक पोस्ट असं करू शकत नाही.

# ऑस्ट्रेलियाकडून खूप काही शिकू शकतो!

## हरमनप्रीत कौरने सांगितले भारताच्या पराभवाचे कारण

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**रविवारी 'करा या मरो'च्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा नऊ धावांनी पराभव करून उपांत्य फेरीतील भारताचा मार्ग कठीण केला. शारजाह येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात, गतविजेत्याने फलंदाजीव्यतिरिक्त गोलंदाजीमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली आणि चांगल्या नेट रन रेटच्या जोरावर अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. त्यामुळे आता भारतीय संघाला इतर संघाच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल. या सामन्यातील पराभवानंतर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने निराशा व्यक्त केली. त्याबरोबर ऑस्ट्रेलियाचा उल्लेख करताना ती म्हणाले की, त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते.**





'मला वाटते की त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते, ते कोणत्याही एक किंवा दोन खेळाडूंवर अवलंबून नव्हते. त्यांच्याकडे योगदान देणारे अनेक अष्टपैलू खेळाडू आहेत. आम्ही चांगले नियोजन केले होते आणि आम्ही शेवटपर्यंत सामन्यात होतो. पण त्यांनी सहज धावा दिल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला पुढे जाणे कठीण झाले.राधाने खूप चांगली गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण केले. हरमनप्रीत कौर पुढे म्हणाली, 'हे एक असे लक्ष्य होते, गाठता आले असते. दीप्ती आणि मी फलंदाजी करत होतो, तेव्हा आम्हाला काही मोठे फटके मारण्यासारखे चेंडू मिळाले होते, परंतु आम्ही त्याचा फायदा घेऊ शकलो नाही. आजच्या सामन्यात आपण ऑस्ट्रेलियाकडून आपण खूप काही शिकू शकतो. पण आमच्या हातात जे होते ते आम्ही करण्याचा प्रयत्न केला, परंतु काही गोष्टी तुमच्या हातात नसतात.'महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या १८व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ विकेट्स गमावत १५१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ २० षटकांत ९ गडी गमावून १४२ धावाच करू शकला. ऑस्ट्रेलियाच्या नेट रनरेटला मागे टाकण्यासाठी भारताला १०.२ षटकांत किंवा त्यापेक्षा कमी वेळात लक्ष्याचा पाठलाग करायचा होता. मात्र, आता पराभूत झाल्याने भारताचा उपांत्य फेरीतील मार्ग खडतर झाला आहे. आता भारताचे भवितव्य न्यूझीलंड-पाकिस्तानवर अवलंबून आहे, ज्यामध्ये भारताला पाकिस्तानच्या विजयासाठी प्रार्थना करावी लागेल.सामन्यानंतर भारतीय संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर म्हणाली, 'मला वाटते की त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते, ते कोणत्याही एक किंवा दोन खेळाडूंवर अवलंबून नव्हते. त्यांच्याकडे योगदान देणारे अनेक अष्टपैलू खेळाडू आहेत. आम्ही चांगले नियोजन केले होते आणि आम्ही शेवटपर्यंत सामन्यात होतो. पण त्यांनी सहज धावा दिल्या नाहीत. त्यामुळे आम्हाला पुढे जाणे कठीण झाले.'हे एक असे लक्ष्य होते, गाठता आले असते. दीप्ती आणि मी फलंदाजी करत होतो, तेव्हा आम्हाला काही मोठे फटके मारण्यासारखे चेंडू मिळाले होते, परंतु आम्ही त्याचा फायदा घेऊ शकलो नाही. आजच्या सामन्यात आपण ऑस्ट्रेलियाकडून आपण खूप काही शिकू शकतो. पण आमच्या हातात जे होते ते आम्ही करण्याचा प्रयत्न केला, परंतु काही गोष्टी तुमच्या हातात नसतात.'महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या १८व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ विकेट्स गमावत १५१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ २० षटकांत ९ गडी गमावून १४२ धावाच करू शकला. ऑस्ट्रेलियाच्या नेट रनरेटला मागे टाकण्यासाठी भारताला १०.२ षटकांत किंवा त्यापेक्षा कमी वेळात लक्ष्याचा पाठलाग करायचा होता. मात्र, आता पराभूत झाल्याने भारताचा उपांत्य फेरीतील मार्ग खडतर झाला आहे. रविवारी 'करा या मरो'च्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा नऊ धावांनी पराभव करून उपांत्य फेरीतील भारताचा मार्ग कठीण केला. शारजाह येथे खेळल्या गेलेल्या सामन्यात, गतविजेत्याने फलंदाजी व्यतिरिक्त गोलंदाजीमध्येही उत्कृष्ट कामगिरी केली आणि चांगल्या नेट रन रेटच्या जोरावर अंतिम चारमध्ये स्थान मिळवले. त्यामुळे आता भारतीय संघाला इतर संघाच्या निकालावर अवलंबून रहावे लागेल. या सामन्यातील पराभवानंतर भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने निराशा व्यक्त केली. त्याबरोबर ऑस्ट्रेलियाचा उल्लेख करताना ती म्हणाले की, त्यांच्या विजयात संपूर्ण संघाचे योगदान होते.

### भारताचा नऊ धावांनी पराभव

आमच्या हातात जे होते ते आम्ही करण्याचा प्रयत्न केला, परंतु काही गोष्टी तुमच्या हातात नसतात.'महिला टी-२० विश्वचषक २०२४ च्या १८व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ विकेट्स गमावत १५१ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात भारतीय संघ २० षटकांत ९ गडी गमावून १४२ धावाच करू शकला. ऑस्ट्रेलियाच्या नेट रनरेटला मागे टाकण्यासाठी भारताला १०.२ षटकांत किंवा त्यापेक्षा कमी वेळात लक्ष्याचा पाठलाग करायचा होता. मात्र, आता पराभूत झाल्याने भारताचा उपांत्य फेरीतील मार्ग खडतर झाला आहे.

# प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूबद्दल मत मांडणे चुकीचे

## विराट जागतिक दर्जाचा क्रिकेटर गौतम गंभीरचे मोठे भाकीत

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी मालिकेला सुरुवात होण्यास अवघे दोन दिवस उरले आहेत. कारण १६ ऑक्टोबरपासून कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडिया जोरदार तयारी सुरु केली आहे. अशात बांगलादेशविरुद्ध मोठी खेळी खेळू न शकलेल्या विराट कोहलीवर सर्वांच्या नजरा आहेत. त्यामुळे न्यूझीलंड मालिकेपूर्वी संघाचा कोच गौतम गंभीर विराट कोहलीची ढाल बनला आहे.**



गौतम गंभीरने विराट कोहलीबद्दल प्रतिक्रिया देताना मोठं वक्तव्य केलं आहे.ट्रॉफीतील कामगिरीबबद्दलही भाकीत केले आहे.भारतीय संघाचा मुख्य कोच गौतम गंभीर कोहलीबद्दल म्हणाला, 'पहा, विराटबद्दल माझे मत नेहमीच स्पष्ट राहिले आहे. तो एक जागतिक दर्जाचा क्रिकेटर आहे. त्याने दीर्घकाळ चांगली कामगिरी केली आहे. पदार्पणाच्या वेळी त्याला जितकी धावांची भूक होती. तितकीच धावांची भूक अजून कायम आहे. मला खात्री आहे की तो या मालिकेत धावा करण्यासाठी भुकेला असेल आणि बहुधा तो ऑस्ट्रेलियाविरुद्धही अशीच कामगिरी करेल.त्यामुळे कोणत्याही खेळाडूचे एका खराब मॅच किंवा मालिकेच्या आधारावर मूल्यमापन करता कामा नये. तुम्ही प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूबद्दल मत मांडू शकत नाही.'गौतम गंभीर पुढे म्हणाला, 'जर तुम्ही प्रत्येक सामन्यानंतर खेळाडूबद्दल मत मांडत असाल, तर ते त्याच्यासाठी योग्य नाही. कारण प्रत्येकाचा दररोज सर्वोत्तम दिवस असतो असे नाही. मला वाटते की आमच्याकडे ज्या प्रकारचे वातावरण आहे, आम्ही

### इंडियासाठी ही मालिका खूप महत्त्वाची

या मालिकेतील पहिला सामना १६ ऑक्टोबरपासून बंगळुरू येथे खेळला जाणार आहे. दुसरा सामना पुण्यात होणार आहे. हा सामना २४ ऑक्टोबरपासून खेळवला जाणार आहे. मालिकेतील तिसरा सामना १ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहे. ज्याचे आयोजन मुंबईत करण्यात येणार आहे. वास्तविक, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या पॉइंट टेबलमध्ये टीम इंडिया पहिल्या स्थानावर आहे आणि भारतीय संघाला आपले स्थान कायम राखायचे आहे.